डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
# वसंतराव नाईक शासकीय कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालय,
## यवतमाळ – ४४५००१
दूरध्वनी क्र. : ०७२३२- २९५१२८ इ मेल : advncab@pdkv.ac.in

जा.क्र.वनाशाकृजैम यवत/प्र.म./८२०/२०२६

दिनांक - ०८/१०/२०२६

## शुद्धिपत्रक सूचना (Corrigendum Notification)

**कार्यालय:** वसंतराव नाईक शासकीय कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ

**कृषि विद्यापीठ अंतर्गत:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

**पत्ता:** वाघापूर रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१

**विषय: वसंतराव नाईक शासकीय कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे कंत्राटीतत्वावर बाह्यस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी दरपत्रक प्रक्रियेबाबत सुधारित शुद्धिपत्रक व मुदतवाढीबाबत.**

**संदर्भ:** १) दरपत्रक सूचना क्र. वनाकृजैतंम/कं.त.बा.म./७३९/२०२६ दिनांक २२.०९.२०२६.
२) दरपत्रक सूचना क्र. वनाकृजैतंम/कं.त.बा.म./७४०/२०२६ दिनांक २२.०९.२०२६.

या महाविद्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या मनुष्यबळ पुरवठा दरपत्रक प्रक्रियेच्या (अंदाजित किंमत रुपये ९ ते १० लाख) अनुषंगाने कंत्राटदारांकडून तांत्रिक व कायदेशीर बाबींविषयी आक्षेप/स्पष्टीकरण प्राप्त झाले होते. खरेदी प्रक्रिया अत्यंत निकोप, पारदर्शक, स्पर्धात्मक आणि शासकीय खरेदी नियमांना धरून व्हावी यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने मूळ निविदा अटी व शर्तींमध्ये खालीलप्रमाणे
सुधारित दुरुस्त्या (Corrigendum) जाहीर करण्यात येत आहेत:

| अ.क्र. | मूळ निविदेतील अट / तरतूद | सुधारित अट / स्पष्टीकरण (आता असे वाचावे) |
|---|---|---|
| १ | **पात्रता निकष:** विषयात "सहकारी संस्था" असा उल्लेख झाला होता. | सुधारणा: शासन नोंदणीकृत सर्व प्रकारच्या मनुष्यबळ पुरवठादार संस्था, प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या, भागीदारी संस्था आणि **MSME/उद्यम नोंदणीकृत संस्था** या दरपत्रक प्रक्रियेत सहभागी होण्यास पूर्णपणे पात्र आहेत. केवळ सहकारी संस्था असा अर्थ घेण्यात येऊ नये. |
| २ | **दर तक्ता (कुशल मजूर स्तंभ):** स्तंभाचे शीर्षक "Rate in Rs. Per Day" (दैनिक) असे नमूद होते. | सुधारणा: सदर स्तंभाचे शीर्षक **"Rate in Rs. Per Month"** (मासिक दर) असे सुधारित करण्यात येत आहे. सर्व कंत्राटदारांच्या दरांची आर्थिक तुलना एकाच मासिक एककावर केली जाईल. |
| ३ | **किमान वेतन व VDA सुधारणा:** अट क्र. ३ व ७ नुसार बदल केवळ पूर्वमान्यतेनंतर देय असा उल्लेख होता. | सुधारणा: कराराच्या कालावधीत (३१.०३.२०२७ पर्यंत) कामगार आयुक्तांद्वारे घोषित होणारे वैधानिक किमान वेतन आणि व्ही.डी.ए. (VDA) मधील बदल त्यांच्या **प्रभावी दिनांकापासून कंत्राटदारास प्रतिपूर्ती (Reimburse)** केले जातील. |

| | | |
|---|---|---|
| ४ | **GST (वस्तू व सेवा कर) तरतूद:** | **सुधारणा: प्रचलित नियमांनुसार GST** लागू असल्यास, रक्कम स्वतंत्र नमूद करावी. |
| ५ | **किमान सेवा शुल्क आणि समान दर (Tie Breakdown):**<br>समान दर असल्यास केवळ प्राधान्य व वाटाघाटीची तरतूद बाबत. | **सुधारणा:** वित्त मंत्रालयाच्या कार्यालयीन ज्ञापनानुसार **किमान ग्राह्य सेवा शुल्क ३.८५%** किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. जर दोन किंवा अधिक कंत्राटदारांचे सेवा शुल्क समान (Tie) आले, तर अंतिम कंत्राटदाराची निवड खालील **द्विस्तरीय पारदर्शक पद्धतीनुसार (Two-Stage Criteria)** केली जाईल:<br>**स्टेज १:** समान दर असलेल्या कंत्राटदारांचे मूल्यांकन खालील एकूण ३० गुणांच्या निकषांवर केले जाईल:<br>१. मनुष्यबळ पुरवठ्याचा एकूण अनुभव (प्रति वर्ष २ गुण, कमाल १० गुण).<br>२. मागील ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल (कमाल ५ गुण).<br>३. शासकीय/विद्यापीठ स्तरावरील समाधानकारक कामाचे प्रमाणपत्र (५ गुण)<br>४. स्थानिक पुरवठादार प्राधान्य (गुण कमाल ५):<br>• कंत्राटदार संस्थेचे मुख्य नोंदणीकृत कार्यालय किंवा मुख्य शाखा कार्यालय **यवतमाळ जिल्ह्यात असल्यास: ५ गुण**<br>• कंत्राटदार संस्थेचे कार्यालय यवतमाळ जिल्ह्याबाहेर असल्यास: ० गुण (शून्य). (याकरिता कंत्राटदाराने दुकाने व संस्था नोंदणी प्रमाणपत्र/गुमास्ता किंवा उद्यम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील).<br><br>**स्टेज २ (सोडत/लॉटरी पद्धत):** जर वरील स्टेज १ मधील गुण मोजल्यानंतरही दोन किंवा अधिक कंत्राटदारांचे एकूण गुण समान (Tie) राहिले, तर अंतिम निवड ही सर्व संबंधित कंत्राटदारांच्या प्रतिनिधींसमक्ष **पारदर्शक सोडत/लॉटरी (Draw of Lots)** पद्धतीने केली जाईल. |
| ६ | **अनिवार्य वैधानिक खर्च व बोनस वितरण:**<br>बोनस, रजा, साप्ताहिक सुट्टी इ. बाबींबाबत स्पष्टीकरण | **सुधारणा:** कामगार कायद्यानुसार अनिवार्य असलेले सर्व वैधानिक खर्च (उदा. बोनस किमान ८.३३%, रजा वेतन, बदली मजूर/साप्ताहिक सुट्टी खर्च आणि MLWF मधील मालकाचे अंशदान) कंत्राटदाराने मजुरांना देणे बंधनकारक राहील.<br>**महत्त्वाची तरतूद:** कंत्राटदाराने मजुरांना **दरमहा (Monthly) वेतनासोबतच नियमानुसार किमान ८.३३% बोनसची रक्कम अदा करणे बंधनकारक आहे.** कंत्राटदाराने मजुरांच्या बँक खात्यात दरमहा वेतनासोबत बोनस जमा केल्याचा स्पष्ट पुरावा (बँक स्टेटमेंट आणि ईपीएफ/बोनस चलनाची प्रत) महाविद्यालयाकडे सादर केल्यानंतर, **महाविद्यालयामार्फत त्या बोनसच्या व इतर वैधानिक खर्चाच्या रकमेची कंत्राटदारास प्रतिपूर्ती (Reimbursement) केली जाईल.**<br>कंत्राटी कामगारांच्या ग्रॅच्युटी (Gratuity) किंवा इतर दीर्घकालीन |

| | | |
|---|---|---|
| | | सेवा लाभांबाबतची संपूर्ण कायदेशीर व आर्थिक जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील. महाविद्यालयामार्फत मासिक देयकामध्ये ग्रॅच्युटीपोटी कोणत्याही रकमेची प्रतिपूर्ती (Reimbursement) केली जाणार नाही. |
| ७ | **देयक अदायगी कालमर्यादा (Payment):** कार्यालयीन देयक मंजुरीच्या मुदतीचा उल्लेख नव्हता. | **सुधारणा:** कंत्राटदाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मजुरांचे वेतन स्वतःच्या निधीतून करणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने परिपूर्ण कागदपत्रांसह देयक सादर केल्यापासून सर्वसाधारण परिस्थितीमध्ये/देयकावर आक्षेप नसल्यास **निश्चित कालावधीत (MSMED अधिनियम, २००६ च्या कलम १५ च्या अधीन राहून)** महाविद्यालयाकडून देयक मंजूर केले जाईल. |
| ८ | **नैसर्गिक न्यायाचे तत्त्व (दंड व करार रद्द करणे):** पूर्वसूचनेशिवाय करार रद्द करण्याची व दंडाची अट | **सुधारणा:** कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई, अनिश्चित दंड किंवा सुरक्षा अनामत जप्त करण्यापूर्वी कंत्राटदारास आपली बाजू मांडण्यासाठी लेखी **कारणे दाखवा नोटीस (Show Cause Notice)** देऊन स्पष्टीकरणाची वाजवी संधी दिली जाईल. |
| ९ | **कामगार परवाना (Labour License):** दरपत्रकासोबतच विद्यमान वैध परवाना बाबत- | **सुधारणा:** दरपत्रक सादर करताना विद्यमान वैध कामगार परवाना किंवा कंत्राट मिळाल्यानंतर मुख्य मालकाकडून 'Form V' घेऊन परवाना मिळवण्याबाबतचे कायदेशीर हमीपत्र **(Undertaking)** सादर केल्यास ते ग्राह्य धरले जाईल. |
| १०. | **मनुष्यबळ संख्या** (पूर्वी नमूद १० ते १५) | **सुधारणा:** आवश्यक कंत्राटी मनुष्यबळ ०८ ते १० |
| ११. | **दर लागू असल्याचे परिमंडळ** | संस्थात्मक शेती / परिमंडळ -१ |

## सुधारित मुदतवाढ वेळापत्रक

उपरोक्त दुरुस्त्यांनुसार इच्छुक कंत्राटदारांना सुधारित दरपत्रक तयार करण्यासाठी आणि परिपूर्ण कागदपत्रांसह सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे ७ दिवसांची मुदतवाढ **(Extension)** देण्यात येत आहे:

- **सुधारित सीलबंद दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ: १५.१०.२०२६ रोजी दुपारच्या ०४.०० वाजेपर्यंत.**
- **दरपत्रक उघडण्याचा (Opening) दिनांक आणि वेळ: १६.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता.**

मूळ दरपत्रक सूचनेतील इतर सर्व सामान्य अटी व शर्ती (वर नमूद केलेल्या सुधारणा वगळून) जशाच्या तशा कायम राहतील. अधिक माहितीकरीता परिगणना तक्ता सोबत देण्यात येत आहे. सर्व इच्छुक कंत्राटदारांनी वरील सुधारित शुद्धिपत्रकाची नोंद घेऊनच आपली दरपत्रके सादर करावीत.

सहयोगी अधिष्ठाता
वसंतराव नाईक शासकीय कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,
महाविद्यालय, यवतमाळ

**प्रतिलिपि** : प्रभारी अधिकारी, (ARIS Cell), डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांना सदर शुद्धीपत्रक सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

# कंत्राटीतत्वावर बाह्यस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी दरपत्रक परिगणना तक्ता

| अ.क्र. | तपशील / घटकाचे नाव | टक्केवारी (%) | गणना पद्धत / सूत्र | अचूक मासिक रक्कम (₹) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अकुशल | कुशल |
| १ | मूळ वेतन (Basic Wage) | - | निश्चित दर | ₹४,६८०.०० | ₹ ६,२४०.०० |
| २ | विशेष भत्ता (VDA) | - | निश्चित दर | ₹४,४४६.०० | ₹४,४४६.०० |
| A | एकूण मासिक किमान वेतन | - | (Basic + VDA) | ₹९,१२६.०० | ₹१०,६८६.०० |
| ३ | ई.पी.एफ. (EPF - मालकाचा हिस्सा) | १३.००% | ₹९,१२६ च्या १३% | ₹१,१८६.३८ | ₹१,३८९.१८ |
| ४ | ई.एस.आय.सी. (ESIC - मालकाचा हिस्सा) | ३.२५% | ₹९,१२६ च्या ३.२५% | ₹२९६.६० | ₹३४७.२९ |
| ५ | मासिक वैधानिक बोनस | ८.३३% | ₹९,१२६ च्या ८.३३% | ₹७६०.१९ | ₹८९०.१४ |
| B | एकूण प्रतिपूर्तीयोग्य वैधानिक खर्च | - | (EPF + ESIC + बोनस) | ₹२,२४३.१७ | ₹२,६२६.६१ |
| C | संस्थेचे सेवा शुल्क (किमाना वेतन वर) | ३.८५% ते ७% | | | |
| D | वस्तु व सेवा कर (लागू असल्यास) | | | | |
| | एकूण | | | | |